17 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वश्रेष्ठ ज्ञान निर्मितीमध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे

## ▪ माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विविधतेमध्ये एकात्मता हे भारताचे वैशिष्ट्य म्हणून पाहिले जाते. या विविधतेमधून सर्वश्रेष्ठ ज्ञानाची निर्मिती व्हावी, यासाठी युवा पिढीचे योगदान महत्वाचे ठरणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा पाच विद्यापीठांचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता साप्ताहिक शिबिरास प्रारंभ झाला. महाराष्ट्रासह १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, विकसित देशांमध्येही धार्मिकतेसह अनेक प्रकारची विविधता असते. त्याप्रमाणे भारतातही विविधतेमधून एकता आणि सहिष्णुतेची भावना निर्माण व्हावी आणि त्यातून ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती व्हावी. यासाठी तरुणांना मोठे योगदान देण्याची संधी आहे. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक–आर्थिक विकासासाठी पावले उचलली. त्या कार्याच्या पाऊलखुणा आजही पहावयास मिळतात. शिबिरातील विद्यार्थ्यांनी दसरा चौकामधील वसतिगृहांच्या रुपाने राजर्षी शाहू महाराजांची सजीव स्मारके पाहावीत. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या निमित्ताने देशभरातून एकत्र आलेल्या तरुणांनी एकमेकांशी संवाद साधत भाषा व संस्कृतीचे अदान–प्रदान करावे. कुटुंब, समाज आणि देशाप्रती निस्वार्थ भावनेने सेवा देण्याचा निश्चय करावा. सुमंतकुमार यादव यांनी देशात ४० लाख आणि महाराष्ट्र–गोव्यात चार लाख एनएसएस स्वयंसेवक कार्यरत असून, ते सामाजिक विकासामध्ये योगदान देत आहेत. शिवजयंती निमित्ताने राज्यात सर्वत्र पदयात्रा काढण्यात येणार असून 'जय शिवाजी, जय भारत' असे घोषवाक्य आहे. या पदयात्रेत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

प्र–कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांना त्यांचे सुप्त गुण प्रदर्शित करण्याची संधी मिळणार आहे. सामाजिक–धार्मिक सौहार्दासह देशभक्तीच्या धाग्याने सहभागी शिबिरार्थी आजीवन जोडले जातील. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रम अधिकारी प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमाजी पाटील यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. समोर उपस्थित देशभरातून आलेले शिबिरार्थी.**

### पारंपरिक वेशभूषा संचलनाने उत्साही प्रारंभ

शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गोवा या राज्यांतील २१ विद्यापीठांचे २१० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. राज्यांच्या पारंपरिक वेशभूषा करून ढोल, ताशा आणि झांजपथकाच्या साथीने संचलन केले. यात आपापल्या राज्यांच्या पारंपरिक लोकनृत्य व परंपरांचे दर्शन घडवले. सर्व सहभागींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत फेरी मारली.

17 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविधतेतून सर्वश्रेष्ठ ज्ञान निर्मिती

## डॉ. माणिकराव साळुंखे : विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता साप्ताहिक शिबिर

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १६ : 'विविधतेतून सर्वश्रेष्ठ ज्ञान निर्मितीसाठी युवा पिढीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे', असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज येथे केले.**





कोल्हापूर : राष्ट्रीय एकात्मता सामाहिक शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. यावेळी व्यासपीठावर उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सुमंतकुमार यादव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले. दुसऱ्या छायाचित्रात शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पारंपरिक वेशभूषेत संचलन करताना शिबिरार्थी.

पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय व शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे आयोजित राष्ट्रीय एकात्मता सामाहिक शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्रासह बारा राज्यांतील एकवीस विद्यापीठांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक त्यात सहभागी झाले आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, 'विकसित देशांत धार्मिकतेसह अनेक प्रकारची विविधता असते. त्यांचे प्राधान्य त्यापलीकडे जाऊन विकासाला असते. भारतात विविधतेतून एकता व सहिष्णुतेची भावना निर्माण होणे व त्यातून ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती होणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणाईने योगदान देणे महत्त्वाचे आहे. विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी देशातील सर्व सामाजिक, आर्थिक घटकांचा सर्वसमावेशक विकास होणे अत्यावश्यक आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक, आर्थिक विकासासाठी पाऊले उचलली. त्या कार्याच्या पाऊलखुणा आजही पाहावयास मिळतात.'

डॉ. शिर्के यांनी देशभरातून आलेल्या तरुणांनी कुटुंब, समाज, देशाप्रती निःस्वार्थ भावनेने सेवा देण्याचा निश्चय करावा, असे सांगितले. महाराष्ट्र एन.एस.एस.चे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी देशातील चाळीस लाख व महाराष्ट्र-गोव्यातील चार लाख एनएसएस स्वयंसेवक कार्यरत असून, ते सामाजिक विकासात योगदान देत असल्याचे स्पष्ट केले. येत्या शिवजयंतीच्या निमित्ताने राज्यात सर्वत्र पदयात्रा काढण्यात येणार असून 'जय शिवाजी, जय भारत' असे त्याचे घोषवाक्य असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सामाजिक-धार्मिक सौहार्दासह देशभक्तीच्या धाग्याने शिबिरार्थी आजीवन जोडले जातील, अशी आशा व्यक्त केली.

राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत केले. कार्यक्रम अधिकारी प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमा पाटील यांनी आभार मानले.

### पारंपरिक वेशभूषेत संचलन...

राष्ट्रीय एकात्मता शिबिरात महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल व गोवा राज्यांतील २१ विद्यापीठांचे २१० स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. त्यांनी आपापल्या राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेसह ढोल, ताशा व झांजपथकाच्या साथीने लोकनृत्य व परंपरांचे दर्शन घडवित संचलन केले. शिबिरार्थींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करत फेरी मारली.

17 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संकटाचे संधीत रूपांतर करणारेच उद्योजक बनू शकतात

## विनया गोरे; शिवाजी विद्यापीठात नवोपक्रम, स्टार्टअप परिषदेचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या संकटाचे रूपांतर संधीत करणाऱ्या व्यक्तीच चांगले उद्योजक बनू शकतात, असे प्रतिपादन अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या प्रमुख विनया गोरे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'विकसित भारत-२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या विषयावरील 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' मध्ये दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रात त्या बोलत होत्या. पीएम-उषा अर्थसाहाय्यित आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचा प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत समारोप झाला.

विनया गोरे म्हणाल्या, उद्योगात यशस्वी होण्यासाठी तीन बाबी फार महत्त्वाच्या असल्याचे सांगून विनया गोरे म्हणाल्या, आपल्याकडे हार्ड स्किल भरपूर असतात; मात्र सॉफ्ट स्किल्सच्या बाबतीत कमी पडतो. त्यामुळे चांगले उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी सॉफ्ट स्किल्स विकसित करण्यावर भर द्यायला हवा.

### फेलोशिप घेणाऱ्यांनी सहभागी व्हायला हवे

शिवाजी विद्यापीठासह अनेक वित्तीय संस्थांकडून अनेक संशोधकांना फेलोशिप मिळतात. मात्र, अशा संशोधकांचा आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा गेल्या दोन दिवसांतल्या नवोपक्रम व स्टार्टअप परिषदेत अल्प सहभाग दिसला. या सर्व फेलोशिपधारकांनी पुढील वर्षापासून सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्याची गरज आहे, अशी अपेक्षा प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी समारोप समारंभात व्यक्त केली.

पहिल्या चर्चासत्रात वरिष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. सी. व्ही. रोडे, बारामतीचे कृषी उद्योजक संकेत भोसले, कायपी मशिन्सचे संजय पेंडसे, शिंपुगडे उद्योग समूहाचे चेअरमन बी. एस. शिंपुगडे आणि बँक ऑफ इंडियाचे गणेश गोडसे सहभागी झाले. यानंतरच्या चर्चासत्रांत महिला उद्योजकांना नवोपक्रम आणि स्टार्टअप उपक्रमांमध्ये असलेल्या संधी आणि आव्हाने या अनुषंगाने चर्चा झाली. ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव यांच्यासह महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुजाता कणसे, 'अवनि'च्या अनुराधा भोसले, भारती डिजिटलच्या तनुजा शिपूरकर, 'छबी ब्रँड'च्या सुप्रिया पोवार आणि प्युअरमी ऑर्गेनिकच्या शर्मिली माने यांनी सहभाग घेतला. डॉ. दीपा इंगवले अध्यक्षस्थानी होत्या.

अंतिम चर्चासत्रात सुप्रिया कुसाळे, जैमीन शाह, परिमल उदगावे, सत्यनारायण आरडे, वरुण जैन आणि अमित चव्हाण यांनी आपापल्या संघर्षाचा काळ आणि त्यातून यशापर्यंत केलेली वाटचाल, याविषयी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2025
सकाळ




कोल्हापूर : 'कायद्याचा दवाखाना'च्या उद्घाटनप्रसंगी रजनीताई मगदूम, डॉ. प्रसाद मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील व अन्य.

# शहाजी विधी महाविद्यालयात 'कायद्याचा दवाखाना'चे उद्घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : शहाजी विधी महाविद्यालयात 'कायद्याचा दवाखाना' या अभिनव संकल्पनेचे उद्घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील यांची ही संकल्पना आहे. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. अमित बाडकर, ॲड. वैभव पेडणेकर आदी प्रमुख उपस्थित होते.

या कायद्याच्या दवाखान्याच्या माध्यमातून घराघरांतील छोटे-मोठे वाद, तंटे मिटण्यास मदत होईल आणि नागरिकांना याचा फायदा होईल, अशी अपेक्षा सौ. मगदूम यांनी व्यक्त केली. आरोग्य शिबिरात वेगवेगळ्या आजारांवर उपचार, मार्गदर्शन केले जाते त्याचप्रमाणे वादविवाद, तंटे या मोफत कायदा साहाय्य दवाखान्याच्या माध्यमातून मिटावेत, या उद्देशाने हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. शहरातील चौकाचौकांत फिरता कायद्याचा दवाखाना स्थापन करून लोकांना विविध कायदेशीर तरतुदींची मार्गदर्शनपर माहिती व समुपदेशन करता येईल, असे प्राचार्य डॉ. पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 FEB 2025
सकाळ





तिसंगी : येथील म. ह. शिंदे महाविद्यालयात पारितोषिक वितरणात बोलताना डॉ. अजितसिंह जाधव. यावेळी पी. जी. शिंदे, स्वप्नील शिंदे, बंडोपंत पाटील, एकनाथ शिंदे, डॉ. आर. एस. पोंदे उपस्थित होते.

# शिंदे महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**साळवण :** ''विद्यार्थ्यांनी आभासी जगामधून बाहेर पडून वास्तव जगाचा अभ्यास करायला हवा', असे मत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी व्यक्त केले. ते तिसंगी (ता. गगनबावडा) येथील म. ह. शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष पी. जी. शिंदे होते. संस्थेचे सचिव स्वप्नील शिंदे, संचालक बंडोपंत पाटील, माजी सभापती एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. पी. जी. शिंदे म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श आणि समाजसुधारकांचा आदर्श विचार विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे.'' प्राचार्य डॉ. आर. एस. पोंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. एल. पवार यांनी सांस्कृतिक विभागाचे अहवालवाचन केले. डॉ. पी. के. पवार यांनी जिमखाना विभागाचे अहवालवाचन केले. डॉ. विनोद कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एस. ए. मोरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. के. मेंगाणे यांनी आभार मानले.